म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ६३९
१६२०

ना. वा. ...
23-3-...

...ांचा नवा अवतार
...शिवाजी महाराज यांचे
परमपूज्य जनक

# राजे शहाजी भोसले यांचा पोंवाडा.



REFBK-0002840
REFBK-0002840

सर्व हक्क भा. स्व. सं. मं. नें राखून ठेविले आहेत.

REFBK-0002840
REFBK-0002840

# प्रकाशकाचे दोन शब्द.

येथील श्रीशिवाजीमंदिराचे जागेंत पुणें—भारतस्वयंसेवक—मंडळामार्फत दरसाल होत असलेल्या श्रीशिवजयन्त्युत्सवांत पोंवाड्यांचा कार्यक्रम ठरविलेला असतो. पोंवाड्यासारख्या मर्दानी काव्यांस उत्तेजन देणें व ज्या चालीवर हे पोंवाडे म्हटले जातात त्या चालींचें पुनरुज्जीवन करणें हा ह्या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सहृदय वाङ्मय ह्या दृष्टीनें जुने अगर नवीनसुद्धां पोंवाडे कितीतरी सुंदर व सरस ठरतील. त्यांतील कल्पनासौष्टव, व काव्यसौंदर्य पाहून आणि कर्णमधुर व स्फूर्तिदायक अशा सुंदर चाली ऐकून आनंद व समाधान न होणारा मनुष्य विरळा. उत्तेजनाचे अभावीं हे पोंवाडे ऐकावयासहि मिळत नाहींसे झाले आहेत. लोकजागृतीचें उत्तम साधन, सरस वाङ्मय, उठावदार व परिणामकारक चाली वगैरे फायदे लक्ष्यांत घेऊन मंडळानें सुरू केलेला हा उपक्रम सर्वथा स्तुत्य, अनुकरणीय व अवश्य आहे असेंच कोणासहि वाटेल. विशिष्ट विषयावर नवीन पोंवाडे करणारास बक्षिसें देऊन उत्तेजन दिलें जातें. यंदां इ. सं. वि. का. राजवाडे ह्यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या राधामाधवविलासचंपूमधील शहाजीराजे भोसले ह्यांचें चरित्रावर पोंवाडे मागितले होते. पसंत केलेल्या पोंवाड्यांपैकीं दोन ह्या पुस्तकांत छापले आहेत. ते पोंवाडे कसे म्हणावें हें निदान साधारण तज्ञ माणसास तरी कळावें म्हणून पोंवाड्यांचें नोटेशन ( स्वरज्ञानचिन्हपद्धति ) परिशिष्टरूपानें दिलें आहे. पोंवाड्यांचा सार्वत्रिक प्रसार व्हावा ह्याकरतां गायनशास्त्रांत सर्वत्र प्रचलित असलेली ही पद्धत अनुसरली आहे. पोंवाड्यांस उत्तेजन देण्याचा हा उद्योग अद्याप बाल्यावस्थेंतच आहे. तथापि हा उद्देश व ही दिशा लोकांस पसंत पडल्यास त्यांच्याच मदतीनें व सहानुभूतीनें ठिकठिकाणीं ह्या मर्दानी काव्याचा प्रसार होण्यास अवधी लागणार नाहीं, अशी उमेद वाटते कळावें. हे विनंती.

चैत्र व॥ १२ शके १८४६ }
पुणें भा. स्व. से. मंडळ }

गो. स. पळसुले.
चिटणीस भा. स्व. मंडळ पुणें.

# शहाजीराजे यांच्या पोंवाड्याचें नोटेशन

या पोंवाड्यांत एकंदर सहा चाली आल्या आहेत. त्या चालींना नंबर दिले असून, ती चाल त्याच नंबरच्या नोटेशनवरून कळून येईल.

पोंवाड्यास नेहमीं केरवा ताल लागतो. त्याप्रमाणें यालाही तोच ताल आहे. बहुतकरून हा ताल सर्वांस माहीत असतो, माहीत नसला तरी ऐकल्याबरोबर त्याचें वजन सहज ध्यानांत येतें. एवढ्यासाठीं फक्त त्याची सम ज्या अक्षरावर येते त्यावर एकाचा आंकडा दिला आहे. त्याहून सूक्ष्म व ज्यास्त खुलासा करण्याची विशेष जरूर नाहीं असें वाटल्यावरून इतर गोष्टींचा खुलासा केला नाहीं.

भा. स्व. से. मं. चिटणीस श्री. पळसुले यांनीं पोंवाड्याचें नोटेशन असावें अशी इच्छा प्रदर्शित केली, म्हणून प्रत्येक चालीची नुसती सा रे ग म आणि तालाचें मुख्य वजन इतकेंच येथें दिलें आहे. गाण्यांतील चिजेप्रमाणें पोंवाडा म्हणणें हें फारसें कठीण नाहीं. यासाठीं कोणतें अक्षर किती जलद किंवा सावकाश म्हटलें जावें याचें संबंधानें सा रे ग म खालीं दिल्या जाणाऱ्या पाव, अर्धी, पाऊण, एक इत्यादि मात्रेच्या खुणा दिल्या नाहींत. पोंवाड्यांमधें असणारा वीररस किंवा करुणरस वठविणें हें म्हणणारावर अवलंबून राहील. आणि पोंवाड्यांत असलेला वीररस किंवा करुणरस श्रोत्यांचे मनावर ठसवून देणें ही गोष्ट मुख्य असलेमुळें बारीकसारीक सा रे ग म फारशी न देतां आमची पोंवाडा म्हणण्याची धाटणी कशी आहे हें साधारणपणें लक्षांत येण्यासाठीं जरूर वाटली तेवढी सा रे ग म व तालाची फोड केली आहे.

तसेंच कोमल तीव्र स्वरांची फारशी भानगड नसून फक्त शुद्ध व कोमल स्वर येतात. त्याकरितां ज्या स्वराखालीं पायमोडी खूण केली असेल तो स्वर कोमल समजावा, बाकी सर्व शुध्द स्वर समजावे. तार सप्तकांतील स्वरावर बारीक टिंब दिलें आहे. मंद्र सप्तकाच्या स्वरास खालीं टिंब दिलें आहे. ज्या स्वराला कोठेंच टिंब नाहीं तो मध्य सप्तकांतील समजावा.

१

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ध न्य | ध न्य | श हा जी | न र | वी र । |
| सां सां | सां सां | सां सां सां | सां रें | सां सां |
| | १ | | | १ |

प्रतापी वीर । क्षात्र अवतार । प्रगटला
सासासा नीनी नीनी धधपप धधधप
१ १

ऽऽ शौर्य रवीऽते जाळ । साह्य ज्यास
धम धप मगरेरे सा मम मम
१ १ १

महारु ऽ द्र दि ऽ कृ--पाळ । मोडिलें यवन
ममम ग रे रे सा नीनी रेसानी सारेरे
१ १ १

बंड जं जा ऽ ळ जी ऽ जी जी जी
रेरे नि सा रे रे नि रे सा सा सा
१ १

२

केला समारंभ फार मोठा ऽ मालोजी राजा ऽ न
मम ममम म मम म गरे रे रे रे धनि सा रे रे
१ १ १
जी ऽ जी
नि रे सा

३

जशा कळा पूर्ण चंद्रा ऽ स । तसा सिंह
नीसा नीसा धध नीनी रे रे नीसा नीसा
१ १ १

वाढलो दिसा दि ऽ स जी ॥
धधध धनी नी रे रे सा
१

( ४ )

बादशहानें भरविला दरबा ऽऽऽऽरऽ
सासासासांसां सांसांसांसांसांसां धि सांधनीधमप
१ १

खाहाऽऽ जीस दिला अधी काऽऽऽ रजी
मधपम गूरे नीसा सारे गूमंरेगू रेसा
१ १

५

निजाम शाही राज्य बुडवीन हो असा
सारे गग गग गगरेग म गरे
१ १
चंग बांधलाऽ त्याऽन जी
रेरे सारेरेग सारेरे सा
१ १

(६)

दोन प्रहर युद्ध निकरान केले पण
नीनी नीसासा सासा सारेरेग गग रेसा
१ १
कोण हटेना कोऽणा ला जी
गग गगरे रेनी नी रे सा
गो. गो. देसाई चालक—गोपाळगायन समाज,
१ १

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

नो. नं. ४६५८
२३-३-२८

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# श्री शाहाजी राजे भोसले

## ( क्षात्र नवावतार )

# यांचा पोंवाडा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
2080
ठाणे

नं. १

मराठी ग्रंथ संग्रहालय
संख्यांक ४६५८
ता. २८-३-२८
ठाणे

**दोहा.**

राजाहो नृप शाहजी यवन करावे वाद ।
हेजिव विधिसि बोलिला ऐसा द्विजसंवाद ॥

**शाहीर——गंगाधर विश्वनाथ गोखले.**

## नमन.

मुळारंभीं श्रीगणपती, शारदादेवी सरस्वती ॥
संत सज्जन धर्म मूर्तीं, चरणीं मस्तक नम्र हें ॥ १ ॥

चाल—गणपती गौरि नंदना । तूं सकल कलांचा निधी मती द्यावि कवना ॥ १ ॥ मज नाहि काव्य कल्पना, दे स्फूर्ति, शब्द भांडार उघडि करि, करुणा ॥ २ ॥ व्याकर्ण वृत्त दर्पणा, स्वर, छंद, यमक पढवावे मला अज्ञाना, ॥ ३ ॥ मी अधीर झालो गाना, ठेवुनि सिद्ध साहित्य करितो प्रार्थना ॥ ४ ॥ डफ दिमडि झांज झणझणा, झणत्कार होतसे जणुका शारदेचा वीणा ॥ ५ ॥ स्वर मधुर ऐकुनी कर्णा, पातले सभाजन गर्दी जाहली स्थाना ॥ ६ ॥ मी अनन्य तुजप्रति शरणा, व्हावे प्रसन्न बैसा हृदयीं काव्य करि स्फुरणा ॥ ७ ॥ अभिमान नाहीं मीपणा, तूं गाता गावविता गायक विद्यारमणा ॥ ८ ॥ ऐकुनियां करुणा वचना । गणराज उभे पाठीशीं देत अभय वचना ॥ ९ ॥ गंधर्व यक्ष अस्माना । ठाकले सर्व त्रैलोक्य उभे जन श्रवणा ॥ १० ॥ हे बोल स्फूर्तीचे जाणा, घ्या गोड मानुनि हीच विनंती चरणा ॥ ११ ॥

चाल—नं. १, धन्य धन्य शहाजि नरवीर, प्रतापी धीर, क्षात्र अवतार, प्रगटला शौर्य रवि तेजाळ, साह्य ज्यास महारुद्र दिक्पाल, मोडले यवन बंड जंजाल ॥ धृ० ॥ मुळ क्षात्रिय शाण्णव कुळी, गोत्र नामावळी, त्यांत अतुर्बळी, भोज राजा जाहिर सर्वाला, वंश पुढें वाढला म्हणती भोसला, आज जनिं असा रिवाज पडला ॥ १ ॥ रजपूत शिसोदे वंश, त्यांचा हा अंश, दक्षिण देशास, मुलुखगिरी करित फिरत आला, कैक वर्षांचा काळ लोटला, बखर इतिहासीं नाहि दाखला ॥ २ ॥ बाबाजीराव भोसले, गांवचे पाटील, राजे जणु बसले, मानकरी घेऊन सदरेला, उभे लोक सदैव मुजऱ्याला, ठेविले धाकांत रयतेला ॥ ३ ॥ कुलकर्णी हेजिब फडणीस, जमाबंदीस, आणिक पागनीस, नेमिले पागा परगण्याला, बारगिर तसेच दिमतीला, ठेवली शिबंदी पहाऱ्याला ॥ ४ ॥ मालोजी बाबाजींचे पुत्र, होते निष्णात, गांवाकि पाटिलकींत, परंतु शिपाई बाणा धरिला, स्वारि शिकारींत आनंद मानला, रणांगणावरती जीव रमला ॥ ५ ॥ सुलतान बुराण मुर्तूजा, निजामशाही राजा, त्याच्यावर फौजा, आल्या अदिलशाही घाला पडला, लग्न मोडण्याचा अपराध घडला, म्हणुन लढण्याचा प्रसंग आला ॥ ६ ॥ मुर्तूजाचे सरदार मालोजी, सरसावले फर्जी, केली फत्ते बुर्जी, पांचहजार मराठी भाला, चालली समशेर उडविला धुरळा, म्हणुन बादशाचा जीव जगला ॥ ७ ॥ भोसल्यांची पुण्याई भली, कीर्ती वाढली, त्रैलोक्यांत गाजली, भवानि शंकर प्रसन्न झाला, पुत्रप्राप्तीचा लाभ घडला, खडा साखरेचा दुधांत पडला ॥ ८ ॥ चाल—नं. २ केला समारंभ फार मोठा मालोजी राजान। ज्योतिषी लिहिती पत्रिका पाहुनी गुण। गर्जतो वनीं शार्दूल दणदणे रान। तसा बाळ पुढति यवनाला करिल हैराण। हा वंशदीप क्षत्रीय पुण्य पावन। स्थापील राज्य राखील गाई ब्राह्मण। आईबाप संतोषित होती भविष्य ऐकून। नांव रस पाहुनी सिंह ठेविले अभिधान। चाल—नं. ३ जशा कळा पूर्ण चंद्रास, तसा सिंह वाढतो दिसादीस। बोबडे बोल मिठास, ऐकतां हर्ष चित्तास। मुसलमानी रीत मुलुखास, लोक म्हणती शहा सिंहास। युद्धाचा गोष्टी श्रवणास, फार उल्हास वाटतो त्यास। लढाईचा हट्ट मनीं ध्यास, बापासंग जाई स्वारीस। फाल्गुन पंचमीचा दीस, सारे सरदार जमले सदरेस। जाधवराव बोलतो मालोजीस, आमची मुलगी तुमच्या पुत्रास। शोभते अस्तुरी खास, जशी रोहिणी पूर्ण चंद्रास। ठेवुनी सरदार साक्षीस,

मालोजी लागले बोलण्यास। द्यावा पानाविडा सर्वांस,आणभाक द्यावी तूर्तास। चाल—मोडते, जाधवरावानें अमान्य झट केले, भोसले झिडकारिले हीण कुळ म्हटलें, क्रोधानें तप्त मालोजी लाल। साह्य ज्यास।

२

मालोजीनें प्रतिज्ञा केली, मोडीन खोड भली, जाधवाचे खालीं, करिन नाक नक्षा उतरीन त्यांचा, अभिमान मोठा भोसले कुळचा, शूर-मर्द खरा क्षत्रिय बच्चा ॥ १ ॥ यापुढें चार वर्षांत, पराक्रम सक्त, करून आटोकाट, दाविला बाणा क्षत्रियांचा, मानकरी झाला पहिल्या प्रतिचा, लौकिक वाढला भोसल्यांचा ॥ २ ॥ बादशानें जाधवरावाला, बोलावुन आणला, रागे बहु भरला, विवाह जिजाबाई शाहजीचा, झालाच पाहिजे हुकुम आमचा, नाहीं तर हक्क सोडा जागीरीचा ॥ ३ ॥ तिथी, मुहूर्त निश्चय आर्धी, लागल्या मग हळदी, लग्नाची गर्दी, वर्णु किती गुंग मती वाचा, अभिमान झडला जाधवांचा, हट्ट पुरा झाला मालोजीचा ॥४॥ मालोजीचा दरारा भारी, थोर कर्तबगारी, मिळविल्या जहागिरी, धार्मिक-भाव होता मुळचा,कैक धर्मशाळा देवळांचा, उद्धार केला चालली अर्चा ॥ ५ ॥ अशी दिगंत कीर्ती करून, योद्धया प्रमाण, रणांगणि शयन, केले काळ झाला मालोजीचा, शहाजी पुढें मालक दौलतीचा, ऐका कथाभाग याच्या पुढचा ॥६॥ चाल—नं.२ शहाजीचा कारभार सुरू झाला येथून। राखीला खूप बंदोबस्त ठेविलें धोरण। यवनांचा ओळखुन कावा तसेच वर्तन। शस्त्रास्त्र युद्धविशारद शास्त्र नैपुण्य। चौदा विद्या चौसष्ट कला निधी संपूर्ण। ऐन उमेदवार पैलवान तगडा जवान। आनंदी हसत मुख मुद्रा शांत प्रसन्न। रजपूत मराठी वंशाचा जागृत अभिमान। ठेविला लोकावर वचक रहाति दबकून। असे कवी घेऊन आधार करतो वर्णन। यांत नाहीं उणापुरा शब्द वाहतो आण। तुम्ही ज्ञानी समंजस पहावे बखर उघडून। चाल—नं.४बादशानें भरविला दरबार, शहाजीस दिला अधिकार। प्रतिपाळ करावी जहागीर, सैन्य पायदळ राखा मातबर। एकांती नेऊन सत्वर, बोलला गुपित गुह्य सार। तुम्ही आमचे इमानी नौकर, तख्ताचा लौकिक राखणार। तुमच्यावरती आमची मदार, बाकी सरदार भरती खोगीर। मोंगलानी केले जर्जर, निजामशाही खास बुडणार। आदिल_शहाशीं आमचे वैर, त्यानें राज्यांत मांडला फितूर। गोवळकोंडा आणि

बेदर, करुं पाहती आमची शिकार ! मी बाहुले सिंहासनावर, कारभारी करतो मलिकअंबर। त्याच्या धाकानें झालो बेजार, सोडवा मी दीन पामर। बादशास पाहुन लाचार,शहाजीस आला गहिवर। अभयवचन देऊनी धीर, बादशाचा बदलविला नूर। चाल मोडते, शहाजीने घेऊनि ही संधी, चालविली बुद्धी, केलि मर्दामर्दी, राज्य कारभारांत घेतली पुढें चाल ॥

३

जाहागिरीचा बंदोबस्त करून, करोल फौज घेऊन, शहाजी गेले चालुन, मोंगलावर फिरली वक्र दृष्टी, लागला शनी साडेसाती पाटी, काळची गती उफराटी ॥ १ ॥ बऱ्हाणपूर केले पादाक्रांत, एका झटक्यांत, मोगलासि मात, कळतां झाली नेत्रे लाल दृष्टी, केस तोडितो हात आपटी, मनामध्यें झाला फार कष्टी ॥ २ ॥ टाकोटाक हुकुम फर्माविला, आपल्या पुत्राला, दक्षिणदेशाला,जाऊनि जिकावा निजाम हट्टी, फिरवा नांगर राज्यावरती, यावे मग इकडे भेटण्यासाठीं ॥३॥ निजामाच्या गुप्त हेरानी,लगबग येवोनि, बातमी कानीं, सांगता झाला निजाम कष्टी, घाबरगुंडीं उडाली मोठी, भागुबाई भ्याली उगीच ऐटी ॥ ४ ॥ झटदिशी सरदार जमविले, जाधव भोसले, मोहिते खंडागळे, त्यांत बोलतो निजाम गोष्टी, राज्य राखावे तुमच्यापाठीं, पडलो संभाळा हीच विनती ॥ ५ ॥ शाहाजीचा पाहुन सन्मान, जाधव बेभान, झाले क्रोधायमान, द्वेष भोसल्यांचा माईना पोटीं, सूड घेण्याची बुद्धी खोटी, संधि हुडकतो जाधव कपटी ॥ ६ ॥ इतक्यांत घडले विधीघटन, सरदारांची सैन्य, बाहेर पडतांना, भोसले जाधवांच्या पडल्या गाठीं, झाली चकमक खेटाखेटीं, कैक झाले घायाळ मृत्युपंथी ॥ ७ ॥ भोसल्यांचा एक रणशूर, चालवी समशेर, उडविले शीर, जाधवपुत्राचे सहजगती। लगेच भोसल्यास पाठोपाठीं, धाडले लुखजीनें स्वर्ग भेटी ॥ ८ ॥ बादशासी वर्तमान कळले, धांवून स्वतः आले, जाधवासि बोलले, लावले काळे मलिन केली कीर्ती, तुमच्या अकलेची झाली माती, साठीची बुद्धी अशी नाठी ॥९॥ चाल—नं. २ कटु शब्द ऐकुन जाधवराव फार उसळला। पुत्रशोक तशांत अपमान दुःख चित्ताला। वासुकी सर्प महादुष्ट डाव त्यानें धरला। पाहतो संधी कडकडुन चावा घेण्याला। भोसल्यांची कमान चढु लागली अशा संधीला। झाला पुत्र जिजा शहाजीस आनंद सर्वाला ॥ त्याचे नांव ठेविले संभाजी विदित व्हावे सकला। बादशानें

मांडला उत्साव खजिना खुला केला । ते पाहुन मिरच्या जाधवाच्या लागल्या नाकाला ॥ चाल–नं. ५ निजामशाही राज्य बुडवीन, असा चंग बांधला त्यान । विजापुरच्या बादशाला जाण, गेला शरण झाला दिनवाण। चार हजार तनखा घेऊन,जाधवराव बनले दिवाण। नव्या धन्याची मर्जी प्रसन्न, राखण्यास चाटतो पायतान । धन्यापुढें गोंडा घोळि श्वान, तसा झाला स्वाभिमान शून्य । सरकारच्या साह्य संगतीन । घेऊ पहात लोकाचे प्राण । मोगलांची मदत घेऊन, निजामास मारावे पूर्ण । असा सल्ला बादशाला देऊन,लढाईचे केले कारस्थान । चाल मोडते,यापुढें लढाईची मात, जाधव भोसल्यांत, रणांगणावरत, दोघे भिडणार कराल आणि काळ॥

४

निजामानें आपले सरदार,जमविले सार, मानकरी थोर, आले सैन्याची गर्दी झाली, फुले अस्मानची खाली पडली,धरित्री माय जणु फुलली ॥ १ ॥ बादशानें दिले बक्षीस, सर्व सैन्यास, वाटला उल्हास, शेले पागोट्यांची खैरात झाली, तशांत निघण्याची नौबत झडली, सैन्य नगराच्या वाटेस लागली, ॥२॥ पल्लेदार हातामधें भाला, तलवार कमरेला, ढाल पाठीला, बिचवा कटियार पट्यांत खवली, अशा हत्यारानें सेना सजली, हरहर मुखीं विरश्री चढली ॥ ३ ॥ नगराच्या रानामध्यें सैन्य, येऊन दिले ठाण, केव्हां रणांगण, गाठूं अशी ईर्ष्या मनांत भरली, शिरें हातावरती त्यांनी घेतली, जिवाची तमा नाहीं धरली ॥ ४ ॥ शहाजींचे हेर आसपास, हिंडून घेति वास, आगाऊ वर्दीस,देती शहाजीस वेळोवेळीं, शत्रु सैन्याची अघाडी दिसली, अकस्मात् आली नगरा जवळी ॥ ५ ॥ दूरवर सैन्य पाहून, केली व्यूह रचना, नौबत ढणढणा, शिंगे शहाजणे वाजु लागली, हरहर महादेव हरळी, देऊन सिद्ध उभी राहिली ॥ ६ ॥ शाहाजीला अघाडीस पाहुन जाधव आले धांवून, डुकर मुसंडीन, सेनेशी सेना जाऊन भिडली, आपपरभाव दृष्टी मिटली, सफाई तलवार कापित सुटली ॥ ७ ॥ जसे लढले देव दानव, कौरव पांडव, किंवा यादव, रक्त शोणिताची नदी वाहिली, असंख्यात धारातीर्थी न्हाली, सार्थक झाले मुक्ती पावली ॥ ८ ॥ या घोर सैन्य सागरांत, शहाजी तळपतो, पट्टा चमकतो, जशी अस्मानांत चपल बिजली, सुदर्शन चक्र किंवा मरळी, गरगर फिरतो अंतराळी ॥९॥ चाल—नं. ६ दोन प्रहर युद्ध निकरान,केले पण कोण, हटेना कोणाला॥ ते पाहून लागला

घोर, निजामाचा धीर, सुटुनिया गेला ॥ ही बातमी कळतां शहाजीस येऊन निजामास, बोलू लागला ॥ पहा चमत्कार थोडा वेळ, युद्धाचा खेळ, मग मला बोला ॥ असें बोलुन गेले झटक्यांत, घुसला सैन्यांत, बाण सुटला ॥ केलें युद्ध फार घनघोर, विजापूरकर, उताणा झाला ॥ केला मोड फिरविला डाव, सरदार जाधवराव,पळुन मग गेला॥अशी झाली कीर्ती दिगंत, काळ इतक्यांत, आडवा आला ॥ चाल—नं. ४ राजधानींत होतां आगमन, शहाजीसी झाला अपशकुन । बादशाचा वजिर मुसलमान,मांडिले त्यानें कारस्थान ।इतरांचा करून सन्मान,शहाजीचा केला अपमान । निजाम शहा गेला उलट्टन, झालें दुःख उदास अंतःकरण। या राज्यांत लागेना मन, नोकरी सोडून बसले उदासीन । हे व्यर्थ जिणे पराधीन, करूं स्वतंत्र राज्य स्थापन । हिंदुपद पातशाही पूर्ण, मराठ्यांचे दावूं मराठपण । किती शिर-जोर झाले यवन, देशा बाहेर देऊं हाकलून । आम्ही मालक आमचा हिंदुस्थान, हे कुठुन आले सैतान । यानीं आमची केली धुळधाण, याना मारून करूं परित्राण । चाल—मोडते, असा पूर्ण मनसुबा केला, शहाजी निघून गेला, गरीब लोकांला, दुःख झालें न्हाले अश्रुनीं गाल ॥

५

निजामशावर शहाजी रुसुन गेला, घेऊन सेनेला, बातमी विजापूरला, कळतां फार झाला आनंद बादशास, निरोप धाडला तशा समयास, यावे संभाळावें आमच्या मुलखास ॥ १ ॥ शहाजींनें लखोटा वाचिला, विचार सुरु झाला, जाच चित्ताला, वीट आला पुरे नोकरीचा त्रास, गुलामगिरी झाली येवढी बास, ताबेदारी नको आतां आम्हांस ॥ २ ॥ जिजाबाई शहा-जीची पत्नी, हुशार धोरणी, समजुनी मनीं, वृत्ती नवऱ्याची, बोलते त्यास, पोटांत शिरावे शत्रुच्या खास, रुसुन कांहीं नाहीं होणार कार्यास ॥ ३ ॥ भोसल्यांच्या कुळीं भगवान, होणार अवतीर्ण, दुष्ट निर्दाळण, करून सुखवील महाराष्ट्रास, झाला दृष्टांत तुमच्या वडिलांस, पुर्तेपण करणे लागे तुम्हांस ॥ ४ ॥ निजामशाही तसेच विजापुरीं, दिल्लीच्या दरबारी, शिरुनि भीतरीं, संपादन करावा त्यांचा विश्वास, जैसे वागणे तसा सहवास, भेद घ्यावा पुरे ओळखा यवनास ॥ ५ ॥ निजामाची केली नोकरी, इमान इतबारी, काय आखेरी, फळ प्राप्त झाले तुमच्या हातास, राजनिष्ठेच्या व्यर्थ मोहास, भुलूं नका हीच विनंति तुम्हांस ॥ ६ ॥ हे राजे नव्हेत

आमचे, हिंदुधर्मांचे, किंवा रक्ताचे, नाहीं दया माया आमुची त्यास, उजाड केला मुलुख आला वनवास, चरचर चिरिती गाई ब्राह्मणास ॥ ७ ॥ विजापुरचे मानुन आमंत्रण, घ्यावे पुढारपण, करुनि कारस्थान, वळवुन ठेवा सर्व मराठ्यास, राज्य हिंदूचें स्थापणे तुम्हांस, धोरण हे ठेवुन वागा समयास ॥ ८ ॥ ही गोष्ट शहाजिस पटली, वृत्ती आनंदली, संमती दिली लागला स्वराज्याचा मनि ध्यास, रुसवा सोडोनी आंत घुसण्यास, शहाजी गेला विजापुरच्या राज्यास ॥९॥ चाल—नं.४ विजापुरी मराठे कोण कोण, याचा ठाव काढिला शहाजीन । मराठ्यांचा संघ स्थापन, करण्यास झटे रात्रंदीन । जाधवाची गांठ घेऊन, दिलखुलास करतो भाषण । तुह्मी आम्ही मिळुन दोघेजण, करू देशकार्य नेटान, आम्ही तुमचे वडिल घराण, जोडिले नात्या गोत्यानहीं आतां राहिले कुठें भांडण,सोडा क्रोध चरणीं मी लीन । नाहीं मानली गोष्ट जाधवान, बोलतो फार ताठ्यान । तुम्हीं भोसले सारे कुळहीन, बंड मांडले झालां बेमान। मुकाट्यानें जावे नीघून, नाहींतर कैद करीन । जेथें तुम्ही तिथें आम्ही राहण,कधीं नाहीं घडणार येथून। जाऊ निजामशाहीत निघून, एकवार लढवूं रणांगण । चाल—नं. २ जाधवानी स्वारी सुरु केली शहाजीवर। शहाजीनें फार दूरवर करून विचार। नाहीं लढला सासऱ्याशीं कधीं असून खंबीर।दावूनी चुणुक जाधवास घेतो माघार। जिजाबाई होती संगतीस नवऱ्याबरोबर । गरोदर पूर्णमास झाले कष्ट अपार। पाहुनी जिजाबाईस सांगती सुविचार। तुम्ही जाऊन व्हावे स्थिर चित्त शिवनेरीवर। तुमच्या उदरीं प्रकट होणार शंभु अवतार। या स्वारींत मला कांहीं नाहीं अपाय होणार। दमछाकी जाधवांची करून येईन सत्वर। मानुनी शब्द नवऱ्याचा गेली झटकर । चाल—मोडते, ग्रह वेळ मुहूर्त पातला, शिवाजि जन्मला, यवन लोकांला, वाटले आला समिप हा काळ ॥ ५ ॥

६

विजापुरचा घेउनि आधार, शहाजि सरदार, झाले मातबर, वाढविले घोडेस्वार सैन्य, बंदोबस्ताच्या निमित्तान, दहा हजाराचे भरति पूर्ण,॥१॥ लढाईचा सराव सैन्यास, असावा हमखास, म्हणून बादशास, शहाजि बोलले हात जोडून, कामगिरी घ्यावि माझ्या कडून, स्वस्थ बसवेना पडेना चैन, ॥२॥ निजामाचें करितो पारिपत्य, जाऊन पुण्यांत, आपण गम्मत, पहावि इथें विजापुरांत बसून, आपल्या मुलुखाची हद्द नेऊन, भिडविन

दिल्लीस देईन ठाण ॥३॥ असे मनोराज्य कारवाई,पाहुन मियाभाई, भुलले त्या ठाई, फसलि ती भोळि मुसलमान, पुंगि वाजवितां गारुडयान, सर्प गुंग होति टाकती मान,॥४॥ शहाजिचा करुन सत्कार, कामगिरीवर, धाडले सत्वर, जुन्नर प्रांतांत राहिले येउन, अंदाधुंदि राज्य पाहुन, मांडलि कटकट कारस्थान, ॥५॥ निजामाचे सारे सरदार, केले फितुर, शिथिल कारभार, वेडा झाला निजाम संशयान, कित्येक सरदारांचे घेतले प्राण, कैद केला दिवाण फत्तेखान, ॥६॥ जिकडे तिकडे बेमानिचा वास, आला निजामास, त्यानें जाधवास, धरुन एकदम केला खून, कळतां शहाजीस वर्तमान, उड- विन म्हणतों धूळ धाण,॥७॥ शहाजिचें सैन्य भालाईत, लढाऊ एकजात, सारे पटाईत, घुसले निजामींत धडाक्यान, सूड घेण्याचे निमित्त करून, मुलुख बडविला केले हैराण, ॥ ८ ॥ मराठ्यांचा दणका सुरुं झाला, निजाम चळचळा, कापुं लागला, बोलतो कुराण हातीं घेऊन, द्यावे आम्हास जीव–दान, झालो आम्ही आतां शक्तिहीन,॥९॥ अदमास पाहुनि शहाजिनें केलें मागणे,द्यावे परगणे, नाहिं तर येतों सैन्य घेउन,व्यर्थ दुखविलें आमचें मन,आतां बसा करित ठणठण, ॥ १० ॥ चाल नं २ निजामानें दातिं तृण धरुन कबुल सारे केलें। शहाजिस जुन्नर संगमनेर प्रांत मीळाले । ही बात- मि कळतां झाले थक्क विजापूरवाले। शहाजिचें बंड दक्षिणेंत फार माजलें। त्यानें जाउन पहिल्या घासाला निजामास खाल्ले। झाले मस्त भोंसले, धिंगाणा घालुं लागले। त्यानीं आम्हास गोड गोड थापा देउनि फसवीले। निजामाच्या मागुन आमाचि पाळि येणार हें ठरलें। भोसल्यांनीं आमच्या छातिवर रोखिले भाले । ही दुष्ट जात मरगठ्ठे साप उलटले । चाल नं ४ आदिलशहानें सारा वृत्तांत, दिल्लीस धाडिलें खत । मराठ्यांचें राज्य झालें येथ, आतां नाहिं आमाचि धडगत । शहाजिचा दरारा सक्त, त्यानें केले किल्ले हस्तगत । निजामासि ठेउन मूठींत, शाहाजि भोसले फार गुरगुरत । तुम्हि येउन करावे पारपत्य, अम्हासि नाहिं निभावत । आले शाजान बादशा धांवत, अदिलशासि केलें खलबत । निजा- माचा मुलुख अपसांत, घेऊं वाटुन आपण दोघे फक्त । शहाजिनें ओळखुन वक्त, केला डाव निराळाच तूर्त । शहाजानबाद- शाचि भेट, घेतली केली मसलत । आम्हा मान्य दिल्लीचें तक्त, आम्ही तुमचे सरदार अंकीत । इतराशीं बरोबरि नात, ठेऊन वाढवुं तुमचि

इभ्रत । चाल मोडते—शहाजिनें काढुनि ही युक्ति, अशी वरकांति, दाविली भक्ति, लढाइ देण्याचि केलि टाळाटाळ ॥ ७ ॥

७

शहाजिनें पाहुनि रागरंग, विजापुरचा संग, सोडला निसंग, झाले दिल्लीचे पक्षपाती, एकापुढें एक कमान चढती, राज्य स्थापण्याची तयारी करती, ॥ १ ॥ हत्ति घोडे पागा सरंजाम, राजाची चिन्ह, ठेवलि जमवुन, येतिल उपयोगि वेळ वक्ति, दोन बादशाचे भांडण मस्ति, दुरुनच चमत्कार पहाति, ॥ २ ॥ दिल्लीच्या बादशाचे काज, धोरण ठकवाज, एकच राज्य, असावे हिंदुस्थानावरति, पुरातन तक्त दिल्ली प्रांति, त्याचा अंमल व्हावा जगति, ॥ ३ ॥ हा कावा जाणुनि सत्वर, विजापुरकर, करिति वीचार, काय हा न्याय असा जगतिं, अशक्ता कोण कधीं न पुसति, बळी ते कानापिळि ठरती, ॥ ४ ॥ यासाठीं काढली तोड, केलि तडजोड, निजामास गोड, बोलुनि तह केला गुप्तरीति, झालि आण भाक वचन पूर्ति, सहाय एकमेक करावे म्हणाति, ॥ ५ ॥ निजामाचि लहर पुनः फिरालि, विपरित बुद्धि झाली, तशांत बंडाळि, माजलि राज्यांत दरोबस्ति, दिवाण फत्तेखान झाला पुढाति, खून निजामाचा केला अन्ति, ॥६॥ शाजान बादशानें पहिली, गोष्ट मनिं आणालि, निजामशाहि खाल्लि, पाहिजे वेळ आलि नुकति, गिधाडे बसालि आशेवराति, लचके तोडण्यास धाड घालीति, ॥७॥ निजामाचें राज्य गेल्यावर, आमचे विजापुर, कशास राहणार, येईल हातामध्यें आमच्या नरटी, साहाय शहाजिचें घ्यावे वक्तिं, म्हणुनि बादशा हा पाय धरिति, ॥८॥ चाल नं २ आला टाकोटाक चालुनि मोंगल सरदार। असरखान घेउन सैन्यास विजापुरावर। निजामशाहि पचविलि आतां नाहीं खातर। अदिलशाहि सैन्य उडविन वरच्यावर। शहाजिस बोलावणें केलें यावे लौकर। विजापुरची बादशाही देऊं उडवुन सत्वर। आम्ही आलो इकडे लढण्यास तुमच्या बळावर। शहाजिनें हुकुम नाहीं मानला झाला शिरजोर। त्यानें असरखानास धाडिलें मार्मिक उत्तर। आदिलशहा राहतो दक्षिणेंत आमचा शेजार। त्याचे आमचे नाते मैत्रिचे पूर्वापार। तुम्हास मदत होणे नाहीं येथुन पुढें म्होर। तुमचि आमचि गांठ यापुढें रणांगणावर चाल नं ४ शहाजिनें पाहुनि तान मान, युद्धास केलें आव्हान। विजापुरचा रणदुल्लाखान, त्याचा

केला स्नेह संपादन। जगदेव मुरार पंतान, सहाय केलें वेळेवर येऊन। या तिघानि तीनिकडून, असहाय वेढला असरखान। केला मोड फडशा पाहून, नेला मुलखाबाहेर पिटाळून। किल्ला परिंड्याचा स्वाधीन, तेथें जाउन ठेविलें ठाण। असे रंग शहाजिराजान, बदलले प्रसंग पाहून। राज्यकार्यि नाहीं बंधन, वेळ येइल तसेच वर्तन। चाल मोडते—शहाजिनें करुनि धारिष्ट, घेतले कष्ट, मोंगलाशीं स्पष्ट, लढाई देण्याचा केला गोल माल ॥ ७ ॥

८

सैन्याची ऐट अकडबाज, पाहुनि साज, शहाजिमहाराज, लागले बोलाया सैनेला, नेत्रांतुनि अश्रु घळाघळां,वाहति कंठ भरुनि आला॥१॥ तुम्ही माझ्या जिवाचे गडि, आलि वेळ घडि, उतरुं पैल तडि, राखुया देव धर्म आपुला, मर्द मराठ्यांच्या नांवाला, जागवावे दावा पाणि सकला॥२॥यवनांचें माजले बंड, फार प्रचंड, मोडुनिया थंड, शांत करुं देवि भवानिला, रुधिर असुरांचे पाजुं तिजला, लागलि तृषा कंठ सुकला ॥३॥ मराठ्यांच्या जातिची रीत, शत्रुसंगत, लढावे समरांत, असें भगवान कृष्ण वदला, ऐकतां पार्थाचा मोह हरला, युद्ध करण्यास सिद्ध झाला, ॥४॥ मोंगलाचि लढण्याची धर्ति, ऐकिलि कीर्ति, पराक्रम शक्ति, पाहु एक वेळ करून हल्ला, मारुं किंवा जाउ मरून आजला,निश्चय हाच आमचा झाला॥५॥हा महाराष्ट्र मराठ्यांचा, नाहीं यवनांचा, त्यांच्या बापाचा, व्यर्थ आजवर त्यानिं लुटला, शिरला चोर घरांत मालक बनला, हुसकून काढले पाहिजे त्याला,॥६॥आम्हि आलो तुमच्या जिवावर, लढण्यास येथवर, मोंगल करूं ठार, त्यांच्या पापाचा घडा भरला, स्वराज्य स्थापण्याचा वक्त आला, हरहर महादेव बोला ॥७॥ मग बांधुन कोट सैन्याचा, घोट नरडीचा, घेण्यास यवनाच्या, शहाजि सरदार पुढें घुसला, सैन्य वावटळ लोळ उठला,जसा काय प्रळयकाळ आला,॥८॥घनगर्ज युद्ध सुरूं झालें, रक्तानें न्हाले, मराठी भाले, मोंगल सैन्यांत तोबा उडला, पळालि रानोमाळ, एकच गिल्ला, भागो सैतान आया, अल्ला,॥९॥ मराठ्यांचि फौज फार थोडि, होति पण केवढि, मारलि अघाडि, झाला संतोष सुरवराला, फुलें उधळति आनंद वाटला, यशदुंदुभि वाजुं लागला, ॥१०॥ चालः—२शहाजिनें जिंकिलि कुस्ति पाहिला अदमास। हा तिसरा यत्न सुरू झाला राज्य स्थापण्यास। केला पराक्रम अद्‌भूत मारले राक्षस। हळु हळु पसरलें पाय पाहुन समयास। निजामाच्या वंशातिल एका राजपुत्रास। हातीं

नों. नं. ४६२५
23-3-25

धरून करितो कारभार दिवसादिवस। गेलेला मुलुख जोडिला परत राज्यास। प्रजेची घेतो काळजी सुख सर्वास। पाणपोया घालि अन्नछत्रें भोजन सुग्रास। नाहीं जुलुम जबरि कुणावर न्याय हमखास। केलें रामराज्य तीन वर्षे लोक होति खूष चालः–२ शहाजिचें पाहुनि ऐश्वर्य, मोंगलास वाटला मच्छर। याला असाच वाढुं दिला तर, पुढें आमच्या बसेल उरावर। निजामाचे शेंबडे पोर, पुढें करून चालवि कारभार। आपण बसुनि सिंहासनावर, घेतो सरदाराचे मुजर। भालदार आणिक चोपदार, मोर्चेल चौरिचामर। राजचिन्हें नेहमिं बरोबर, वाळगी जसा कां इंद्र। हें स्वराज्याचें मंदीर, मोडलें पाहिजे पुन्हां एकवार। असा मनांत करून विचार, मांडला भेद मुलुखभर। होता शहाजि धूर्त चतुर, त्यानें नाहीं चालुं दिली तार। आला राग बादशास अनावर, झाला लगेंच युद्धास तयार, चाल मोडतेः—लढाईची करून गर्जना, आली मोंगल सेना, शहाजिनें पुन्हां, घेतलि हातामध्यें समशेर आणि ढाल, ॥ ८ ॥

रि. क्रमांक ६४२६
२८-३-२५

९

मोंगलांचा सैन्य सागर, निजामशाहीवर, आला झरझर, यवनमय झाली सर्व धरणी, देवळे राऊळांचा भंग करुनी, वेढिलें शहाजीस त्यांनीं ॥ १ ॥ शहाजान बादशा फार धूर्त, कपटाची मात, केली अकस्मात्, विजापुरवाल्यास तंबि देऊनी, घेतला झटक्यांत सामिल करुनी, जातीशीं जात मिळाली, दोनी ॥ २ ॥ विजापुरानें शाजिराजाला, वेळींच दगा दिला, परि न डगमगला, चढले अवसान प्रसंग पाहुनी, कुणाचे नव्हें अंती कोणी, खूण गांठ बांधली मनांत त्यांनीं, ॥ ३ ॥ शहाजीनें बेत बदालिला, मोर्चा फिरविला, डोंगर माथा धरला, मारले झोडपिले आड वळणीं, तशांत पावसाळा काठिण कोकणी, यवन सैन्य गेले गारठोनी ॥ ४ ॥ जिजाबाई घेऊन शिवाजीस, होती संगतीस, ऐन वेळेस, केला उपदेश अमृत वाणी, विनाकारण मनुष्य हानी, कशापायीं करतां आज लढुनी, ॥ ५ ॥ मराठ्यांच्या जिवाचें मोल, फुकट काय आल, व्यर्थ घालमेल, जाऊंद्या निजाम उलथोनी, फितुर कारभार गुप्त बोलणीं, करतो येत असे आमच्या कानीं ॥ ६ ॥ निजामाची सोडुनिया आशा, तहाची भाषा, बोलुन आपला गाशा, गुंडाळुन जाऊं याच क्षणीं, स्वराज्य स्थापण्यास वेळ अजुनी, नाहीं अनुकूळ ध्यावे ध्यानीं ॥ ७ ॥ असा सर्व मनसुबा ठरला, निजामास सोडला, घेऊन

सैन्याला, जहागिरीस आले शहाजी निघुनी, शिवाजी जिजाबाईस तेथ ठेऊनी, निशिदिनीं लीन देव चरणीं ॥८॥ चाल नं २ एकांत पाहुन शहाजीनें शिवाजीराजाला ; ठेविला शिरावरि हस्त आशिर्वाद दिधला । तुम्ही राज्य स्थापा हिंदूंचे भविष्य काळाला । तुम्हासाठीं आम्ही सरंजाम सारा जमविला । राज्याचा हेतु फार दिवस मनामध्यें राहिला । वडिलांचें फेडावें ऋण सौख्य द्या सकला । आजवर आमुचा जन्म नोकरींत गेला । जसा वक्त आला तसे वागणे पडले आम्हाला । तुम्ही तावेदारी करू नये जीवमानाला । आम्ही केला यत्न परि काळ आडवा आला । चाल नं ३ आईसाहेबांच्या सल्लयानें, वागावे तुम्ही नेमाने । उणा पुर शद्ब नाहीं बोलणे, वडिलांची आज्ञा मानणे । जागोजाग हत्यारे खजीने, ठेविले भरुन मोहोरानें । जिंकावे लोक प्रेमानें, साम दाम दंड भेदानें । जो जसे वागेल तसे वागणे, ठोशास ठोसा लगावणे । गरिबीनें कार्य नाहीं होणे, जबरदस्ती तशिच वर्जणे । वंदावीं देव ब्राह्मणे । दुबळ्यांचा आशिर्वाद घेणे ! यापुढें आमचे लोढणे, नाहीं तुमच्या मार्गामधें येणे । विजापुरचे आले बोलावणे, आम्ही जातो लोभ असो देणे । चाल मोडते——यवनांचा मोडुनी माज, करावे चीज, स्थापावे राज्य, हिंदु लोकांचा करावा प्रतिपाळ ॥ ९ ॥

१०

शहाजीस शिवाजी राजान, केले वंदन, पायावर डोई ठेवुन, बोलले सद्गदीत कंठ, राज्य हिंदूंचे स्थापिन येथ, तेव्हां होईल आपली भेट ॥१॥ गेले कृष्ण गोकुळ सोडून, धाय मोकलुन, रडले सारे जण, सर्वांची झाली तातातूट, दुःख अनिवार अश्रुपात, तसाच वाड्यांत एकच आकांत ॥ २ ॥ हे मायामोह बंधन, तोडुन शहाजीन, केले प्रयाण, विजापूर गांठले आटोकाट, बादशानें केला थाटमाट, भरला दरबार घेतली गांठ ॥ ३॥ अडदांड रानटी मुलुख, प्रांत कर्नाटक, कानडी लोक, त्यांचा राखण्यास बंदोबस्त, नेमले शहाजीस केली शर्त, मोडावें बंड झाले मस्त ॥ ४॥ रायगिरीचा राजा वीरभद्र, पुंड पाळेगार, त्याचा समाचार, घेऊन ठेविला वचन सक्त, खूष बादशहा ऐकुन मात, बक्षिस दिला सारा प्रांत ॥५॥ अफजुला बादशाचा सरदार, फार शिरजोर, नाहीं दरकार, वागतो ताठ्यांत मदोन्मत्त, शरिर अवाढव्य अस्ताव्यस्त, जसा काय रेडा चाले गुर्मींत ॥६॥ कनकगिरचा गिराश बंडवाला, त्याला मोडण्याला, गेला अफजला, वेढला गिराशानें अकस्मात, हाग्या मार

दिला फोडली पाठ, पळतां भुई झाली थोडी वाट ॥ ७ ॥ शहाजींनें येऊन समयांस, करून साह्यास, सोडिवले खानास, म्हणून खान झाला क्रोधाविष्ट, मांडिले वैर ठेवला दांत, मुसलमानांची उलटी रीत ॥ ८ ॥ चाल—नं २ शहाजीने पराक्रम करून मुलुख केला सर । तालखेडा बसव पट्टण लखमेश्वर। बंगलूर प्रांत शिरे आणिक बंकापूर। शके पंध्राशे चौसष्ट साल सुमार। जिंकिला सारा कर्नाटक खंडणी अपार । अदिलशहास देतो करभार करतो कारभार। नावाचें छत्र बादशाचे मुलुखावर । मांडून सवते सिंहासन बसला गादीवर । चाल—नं ३ कावेरीचा राजा जगदेव, तंजापूरचा विजय राघव । चंदीचा वेंकटराव, तिरुमल्ल नाईक अरकाव । तनु गोडु यलु रंगराव, अशी कठिण कानडी नांव । शहाजीने केले उमराव, मग इनाम दिली त्याना गांव । आनंद हर्ष उत्साव, राज्यांत तुष्ट होती देव । असा पाहुन नित्य वर्ताव, बादशानें घातला घाव, पाठविला निरोप धांवाधांव, विजापुरास येऊन एकदां जाव । चाल मोडते—शहाजींनें हुकुम नाहीं मानला, क्रोध बादशाला, येऊन बोलला, पकड कर लावो भोसला मस्तवाल ॥१०॥

११

शहाजीनें बेमान् पणा केला, निमक हराम झाला, असा बादशहाला, आला सशय कारण असे त्यास, शहाजी पुत्रानें पुणें प्रांतास, मांडिले बंड राजरोस ॥१॥ शिवाजिनें मावळे जमवून, सैन्य वाढवून, केली दाणादाण, जिंकुन यवनास मांडला हैदोस, लुटले कल्याणच्या अहमद मुल्लास, नित्य नवी बातमी विजापुरास॥२॥ तुंग तिकोना भोरप कांगोर, लोहगड पुरंदर, राजमाचीवर, रोवलें शिवाजींनें भगव्या झेंडयास, मुलास बापाची आंतून आहे फूस, असा बादशहानें बांधला कयास॥३॥ शहाजीस आणावे पकडून, गोडबोलून, मोठ्या युक्तींनें, म्हणून धाडिले मस्त खानास, धरावें शाबूत जपून शहाजीस, नाहींतर, तुमचाच करील तो घास,॥४॥ घोरपडे बाजी मुधोळकर, घेतले बरोबर, त्याना परस्पर, सांगून बोलाविले शाजिस भोजनास, धरला अचानक दावून विश्वास, लावले काळे मराठ्यांच्या ब्रीदास ॥५॥ पिंजऱ्यांत सिंह सांपडला, गलबला झाला, अलम् दुनयेला, वाईट वाटले पाणि नेत्रास, कोपला ईश्वर कसा वक्तास, वाली नाहीं कोण उरला गरीबास॥६॥ शहाजीचें पुत्र दोन छावे, जसे का वाघ सिंह, उसळुन धांव, घेतली लागले झाप टाकण्यास, चित्ते हरणाच्या पडले पाठीस, भांबाऊन सोडले त्यांनीं बादशास॥७॥ संभाजी आणिक

शिवाजिनीं, भावाभावानीं, दोन्ही कडोनी, वणवा लाविला यवन राज्यास, उठलीं भुतें चोहों कडुनी सर्रास, जणुं काय स्मशानाचा झाला भास ॥८॥ बादशहानें चमत्कार पाहिला, घाबरुन गेला, कुठुन शहाजीला, धरले आम्ही असें होऊन गेलें त्यास, इभ्रत अब्रुच्या लागुनि नादास, मूर्खपणा झाला जाहिर सर्वांस॥९॥चाल॥शहाजीला आणले राजधानीस बदोबस्तानें ; ठेविलें नेऊन तुरगांत भिंत पोखरून । जागोजाग पहारे जय्यत रात्रंदिन । अवचित येतील सैतान नेतिल सोडवून । अशी भिति मनांत सदोदीत वाइट स्वपन। जसा कृष्ण दिसे कंसास तसे गेले होऊन । छाती नाहीं ठार मारण्याची घाबरे मन । गेले एकदां गांठ घेण्यास धीर धरुन । लटलटां पाय कापू लागले गेले अवसान । बोलू लागले शहाजी संगत दूर दूरुन ॥चाल॥नं५॥ मी बादशहा आलो आहे येथ, घ्यावा सलाम अमचा हातोहात । तुमच्या विषयीं झाली फसगत, मागतो माफी घ्यावी पदरांत । केले नादान पणाचे कृत्य, त्याला खान कारणी भूत । त्यानें उगीच केली गंमत, आला भोग भोगणें आम्हा प्राप्त । नाहीं अक्कल आमच्या डोक्यांत, आम्हा राजे नावाचे फक्त । त्याची झाली गैर समजूत, आपणांस व्यर्थ हे कष्ट । दिल सफा व्हावा अपसांत । येवढेच मागणें तूर्त । बादशहानें जोडिले हात, आला शरण झाला अंकीत ॥ चाल मोडते ॥ शहाजीची झाल्यावर सुटका । आनंद सकळिका । साखर एकमेका, देती नरनारी तरुण आणि बाळ ॥

१२

राज्यांत शिवाजी राजान, गुढ्या तोरणे, दिलीं उभारून, चोहिकडे थाट माट केला, आपल्या वडिलांस भेटण्याला, उत्सुक झाला हर्ष वाटला ॥ १ ॥ तोफखाना रिसाला घोडेस्वार, सारा दळभार, जाउनि सामोरे, आणले मुलुखांत शहाजिला, मिरवित मिरवित नेले जेजुरीला, भेटीचा योग तेथें ठरला ॥ २ ॥ खाशा स्वाऱ्या साऱ्या देवळांत, होत्या तिष्ठत, शहाजिची भेट, होऊन गेली वर्षे चोविस आजला, खंडेराय आतां प्रसन्न झाला, भेटले एकमेकां आनंद वाटला ॥ ३ ॥ भेटले कृष्ण अर्जुन, प्रेमाची खाण, नर नारायण, प्रकटरूप झाले भार हारिला, दुष्ट म्लेंच्छाचा नाश केला, शिवाजी अवतार खास ठरला ॥ ४ ॥ तेथून निघाली स्वारी, साऱ्या मुलुखभरी, चोपदार ललकारी, शहाजी राजाचा बोलबाला, हिंदुधर्माचा पालनवाला, जयजयकार सर्व बोला ॥ ५ ॥ शिवाजिचे सार वैभव, पाहुनि देह-

भाव, विसरले राव, आनंद सागरांत जीव रमला । हेतु राज्याचा पूर्ण झाला, दुःखाचा लेश नाहीं उरला ॥ ६ ॥ शहाजिचा वाढता पराक्रम पाहुनि सारेजण, चकित यवन, कारण सांपडेना विचार थकला, युद्ध शास्त्रांत शहाजि पहिला, म्हणूनच विजय प्राप्त झाला ॥ ७ ॥ चाल नं २ शिवाजिने पित्यास बसविले सिंहासनावर । घेऊनी हातांत मोरचेल घालतो वार, हनुमंत रामापुढें उभा राहिला समोर । तशी सेवा करितो चाकरी सदा तत्पर । शहाजिचे वर्णिले गूण येथवर । गाजली कीर्ती पसरली दिगंतावर । राखिला धर्म हिंदूचा केला उपकार । त्या नारायणाची कृपा आहे अपार । गुरुदामोदराचे छत्र नेहमी शिरावर । त्या चरणीं नम्र मस्तक वारंवार । करुनियां गातो पोवाडा गंगाधर । त्याचे राहणें करविरी आहे अंबेसमोर । भारत स्वयंसेवकांनीं संधि दिली फार । म्हणुनियां रचिला पोंवाडा ऐका चातुर । चाल मोडते, अशी दिव्य स्फूर्ती झाली, फुले गुंफिली, चरणीं अर्पिली, शहाजि विजयाची सुबक ही माळ ॥ १२ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

॥ रा॰ शं॰ दळवी कृत. ॥

# पोंवाडा नंबर २.

**चाल—पोंवाडा नंबर १ प्रमाणें.**

धन्य छत्रपतींचे कूळ, दैव अनुकूळ, म्हणुनी व्याकूळ, केले रिपुराजे= एका परीस एक धोरणी, राजकारणी, त्यांत आग्रणी, शाहाजी राजे ॥धृ०॥

मालोजी विठोजी बंधु, धैर्याचे सिंधु, प्रेम संबंधु, युद्ध पेशानें=दरबारी ठेविता दाब, राजे हा किताब, दिला बादशहानें ॥ दोन पुत्र मालोजीस दिव्य, शरभ आणि सिंह, प्रतापी भव्य, बिलंदर शाहणे=नवसिता शरिफ-शहा फकिर, केलें बेफिकिर, म्हणती ईशानें ॥ जेष्ठ पुत्र शाहाजी वीर, समर-पटुधीर, चतुर गंभीर, आनुवंशानें=तैसेच शरिफ बलवान, होते जरा लहान कांहीं वर्षांनें ॥चाल॥ रणशूर मालोजी भारी, त्यास प्रसन्न भवानी गौरी ॥ तव कुळीं पुरुष अवतारी, स्थापील राज्य निरधारी ॥ धन भूमीतील खरो-खरी, लाभले कृपा ईश्वरी ॥ चा॰ दु॰ ॥ पांच हजारी मनसबी निजाम सरकाराकडे, दरदरा एकंदर मालोजीचा चहुकडे, सोयरीक प्रकर्णी जाधवा-सी वांकडे—बादशहा चा कल सर्वदा भोसल्याकडे— हनुमंत सहाय्य मग काय करतिल माकडें—शाहाजीचें लग्न केलें जिजाईसी फाकडे—एका चुटकी सरसी दरबार हाले रोकडे—रणीं पडतां मालोजी बादशाहाला सांकडे—मग आली जाहागिरी आपसुख शाहजीकडे ॥ मोड ॥ चातूर्य पराक्रम थोर, पुण्य शिरजोर, म्हणूनी सामोर, विजय विराजे=राजकारण कारस्थानी, आपेश भरी पाणी, नित्य निर्व्याजे ॥ धन्य छत्रपतींचें कूळ, दैव आनुकूळ ॥ १ ॥

निजामशाहींत आंदाधुंदी, वजीर दोन फंदी, पाहून बेबंदी, यादवी भारी= दिल्लीपती मोंगलशहानें, जय घोषानें, केली मग स्वारी ॥ शाहाजी राजे प्रवीण, केले रिपु दीन, मा साहेबीण, फितुर झाली नारी=सोडुनी निजाम-धनी पाजी, आले मग शाहाजी, आदिल दरबारीं ॥ तिथें मोठें पराक्रम करून, मर्जीला धरून सैन्य सांवरून, केली भायदारी=दिवसेंदिवस वाढउनी फौज, सदा करी मौज, रणा माझारी ॥ चाल ॥ महमद आदिलशहा जाण—नित्य

देई शाहाजीस मान ॥ कर्नाटक जहागिरी त्यात- बंगळूर दिले प्रेमान ॥ वाढले मोठें अवसान—सत्तर हजार हातीं सैन्य ॥ चा०दु० ॥ बादशाही सरदारांत नंबर पहिला दिसे—नांवाचा मांडलिक परी स्वतंत्र असे—दिल्लीपती पराक्रम ऐकुनी दर्पुनी बसे—विजापुरी आदिलशहा उपरोधिक चाहातसे-दरबारी सरदार म्हणती करावे कसे—डोईजड शाहाजी हे आपणा बरें नसे—वागतो स्वतंत्र कधि न आम्हाला पुसे—बंडखोर पुत्रासी फिसालत देतसे— ॥मोड॥ दरबारी आमिर दोन चार, करती विचार, खावंद साचार, ऐका म्हणे माझे=आधीं धरावा शाहाजी एक, पुन्हा साह्यक, त्याच्या कुमरा जे ॥ धन्य छत्रपतींचें कूळ दैव आनुकूळ म्हणूनी ॥ २ ॥

शाहाजीचा करावा अपमान, बादशहाचे कान, भरती दुस्मान, चुगलखोर पाजी=एक दोन वेळ बोलवितां, नाहीं आले स्वत:, झाली इतराजी ॥ शिवाजीस धरायाप्रती, फौज नाहीं हातीं, सांगावे किती, धरावा शाहाजी=मसलतींत मुस्तापखान, आणखी दुस्मान, घोरपडे बाजी ॥ ठरवुनी कपट भयंकर, निरोप सत्वर, यावे लौकर, तुम्ही रण गाझी=राजकारण असे आगणींत, तरी छावणींत, शिघ्रगती याजी ॥ चा० ॥ अनुज्ञा बोल न यावा-उमजला कपटरूप कावा ॥ मग सांगे संभाजी रावा—युद्धाची तयारी ठेवा ॥ सुखरूप आलो तरी वाहवा—नातरी पराक्रम दावा ॥ चा० दु० ॥ सात सरदार आणि तिन हजार स्वार घेऊन—भेटले छावणींत मुस्ताव्यास येऊन-कांहीं दिवस खानानें त्यास ठेउन घेउन—एके दिवसीं शाहाजी निद्रिस्थ पाहून-आसदूखान बाजी घोरपडे पुढें जाउन—केले गिरफदार थोडी चकमकही होऊन—स्वार सरदार गेले बंगळुरासी भिउन—झाला दंगा लष्करी आसी गफलत पाहुन—ठेविले विजापुरीं शाहाजीस नेउन ॥ मो० ॥ आशी ऐकुन गफलत बाजी, पुत्र संभाजी, यवन साम्राज्यीं, उडवी रिपु बुरजे=पुणें प्रांती त्याहुनी दंगा, घालुनी फिंगा, शिवाजी गर्जे ॥ धन्य छत्रपती ॥ ३ ॥

दोहोंकडून दोघांनीं भार, उडविला सरदार, कहार, घाबरे दिसती=बोलती सकळ हरघडी, शाहास आली बडी, खाउनी मस्ती ॥ चित्रकलचा नाईक भरमा, आचाट कर्मा, अंगीं बहु गर्मा, संधी पाहे नुसती=तीन हजार स्वारासह थेट, विजापुरपेठ, लुटली वस्ती ॥ मोहो काढितांच मोहमाया, भुलविती जशा, तसा आदिलशा, सुचिंताग्रस्ती=मनीं म्हणे वजीरकुसळा, क्यां कर आला, जबर हम तस्ती ॥ चा० ॥ आधिनांत झाल्याबर

दसरा—शिवाजीवर आला रिपु वसरा ॥ फत्तेखान मुसेखान दुसरा—बल्लाळ बेरड तिसरा ॥ शिवाजीस पुरंदर आसरा—यवनास म्हणे आतां विसरा ॥ चा० दु० ॥ बेरडानें शिरवळावरी हल्ला चढविला—भिमराव सरदार शिवाजीनें भिडविला—त्याणें रणांत बेरड घडापासून उडविला—फत्तेखान मुसेखान पुरंदरी आडविला—शिवाजीनें मुसेखान कत्तलींत तुडविला—गेला पळून फत्तेखान जीव आपुला दडविला—यवनाची दुर्दशा करून विजय वडविला—ऐकुनीं मुखावर शहानें हात वडविला ॥ ॥ मोड ॥ इतुक्यांत समजली खबर, दिल्लीहुनी जबर, सैन्य आले धवर, शिवाजीस ताजे=इत्ताक्या करना हम खुदा, मालुम नै मुद्दा, करिन तुं रोजे ॥ धन्य छत्रपतीचे ॥४॥

अशा वेळीं मुस्तापाखान, होऊनि हैराण, दैवयोगान, पावला मरण=ऐकुन यवन भूपती, शाहाजी प्रती भिऊनी आला शरण॥नसे तुम्हाकडे अपराध, रिकामा वाद, वजीर कुध्याद कळली संपूर्ण = तुम्ही ऐका विनंती माझी आवरा संभाजी, म्हणुनी धरी चरण ॥ आतां नका होउ बेदिल, सफई करा दिल, म्हणुनी मंदिल, देई आभरण-पोचवी सिंहगडा त्यास,शाहाजी राज्यास, गौरव करून ॥ चा० ॥ झाल्या बापलेकांच्या भेटी- खलबत हितगुजासाठीं ॥ उपरोधिक सांगे गोष्टी- बादशाहास करूं नये कष्टी ॥ धर्मावरि ठेउनी दृष्टी- गो विप्र ठेवा संतुष्टी ॥ चा० दु० ॥ अशी करून शिष्ठाई पुनरपी विजापुरी, बादशाहाला भेटुनी गेले जाहागिरीवरी, चित्रकली भरम्यावर स्वारी करून लौकरी- ठार मारून भरमा मग त्याची जाहागिरी- चिजवस्त एकंदर धाडिली विजापुरी- खुष होउनी शाहानें दिली बिरूदे बाहादुरी- वरकरणी गोड शाहा भीत असे आंतरी- राजासी आग्रहे ठेवी आपुल्या घरीं ॥मो०॥ चार वर्षे ठेविले बसून, पाहे मन खिसुन, कपट न ये दिसुन, म्हणुनी नावाजे= इतुक्यांत आले संकट आती उत्कट युद्ध पुढें ताजे ॥ धन्य छत्रपतीचे कूळ ॥ ५ ॥बादशाहीं सत्तेचा भरम, पाहुनी नरम, कर्नाटकी परम, मातले पुंड= कुतुबशाही वजीर मिर जुमला, कधीं नाहीं दमला, प्रतापी धेंड ॥ मिर जुमला सधन व्यापारी, चतुर जवाहिरी, मुछदी भारी, पराक्रमी गुंड=जातीचा इराणी यवन, आला राजभुवन, फिरत नवखंड ॥ पांच हजार घोडेस्वार, वीस हाजार, पायदळ भार, तोफा प्रचंड= विजापुरची हद्द रेटीत, आला गांठीत लढाइस तोंड ॥ चा० ॥ शाहाजीनें केली तयारी- जोरांत जुमल्यावर स्वारी ॥ पहिल्या धडकेत जवाहिर भारी-

घाबरून पळे माघारी ॥ क्षत्रिया पुढें व्यापारी- कसा टिकेल नव्हे सावकारी ॥ चा० दु० ॥ जुमल्याची दुर्दशा गेली अतीशय उडून- खडी लढाई करीना उभा राहिना भिडून- आडकाठी करीना पुढें येईना चढून- हाबेलंडी पळतां भुई वेढा दिला चहुकडून- गुत्तीच्या किल्यांत आखेरी बसला दडून-आला शरण दातीं तृण सुटला पाया पडून—हात्ती घोडे कर्नाटक आयतेच आले त्याकडून - असा विजय जन्मापासून आला नाहीं घडून- स्वदेशी परदेशी किर्ती गेली खडबडून ॥ मो० ॥ रूमशामापर्यंत किर्ती, पसरली पुर्ती, आवतारिक मूर्ती, शाहाजी राजे=हिंदुस्थान इराण आफगाणी, तुर्कस्थानी, दहशत गाजे ॥ धन्यछत्र ॥ ६ ॥

कर्नाटकी पाळेगार, सकळ केले गार, वक्र उद्दार, काढिना कोणी= दरसाल खंडण्या देती, अभय मागती, जोडुनि पाणी ॥ विद्यानगरपतीचे बंड, मोठे आबंड, त्याचे शत खंड, केली धुळधाणी=पेन कोंडा कर्नुळ कपली, जिंकुनी आपली, बसविली ठाणी ॥ आलमगड घेउनी हातांत, पुढें शिवतात, गोवें प्रांतात, आले चालुनी=फिरंग्यासी सूटला थरकाप, देती आपोआप, आणुनी खंडणी ॥ चा० ॥ जिंकुनी शत्रु समस्त-राज्य करी शाहाजी स्वस्थ ॥ आनिवार वाढले प्रस्थ- चोहोकडेस बंदोवस्त ॥ औरंगजेब चिंताग्रस्त- सैन्याची पाहुनी शिस्त ॥ चा० दु० ॥ तुंगभद्रेपासुनी आवघे कर्नाटक- केले स्वतंत्र राज्य जिंकुनी रिपुत्र हाटक- सत्तर हाजार सैन्य शूर काटक- पराक्रम सिंधुपरी वर्णीयला त्रोटक - अंती शिकारींत हरणावर असतां टक-घोडा पडला आडखळुन दैवगती स्फोटक-शके पंचराशे पंच्यांशी सरले नाटक - सात चौक पोंवाडा त्रिवट चाल आटक- क्षमा करोत सज्जन आसेल यमक तूटक ॥ मो० ॥ जगदंबा कृपेचें सार, पराक्रम फार, पोटीं अवतार, शिवाजी राजे=कवी रामचंद्रानें प्रास, केले सुग्रास, गोड चतुराजे ॥ धन्य छत्रपतीचें कूळ, दैव अनुकूळ, म्हणूनी व्याकूळ, केले रिपु राजे=एकापरीस एक धोरणी, राजकारणी, त्यांत आग्रणी, शाहाजी राजे ॥ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........

REFBK-0002840

मागवा ! ! !                                    मागवा ! ! !

पुणें भारत स्वयंसेवक मंडळामार्फत

प्रसिद्ध झालेले दोन ऐतिहासिक उपयुक्त निबंध.

लेखक:—वि. ल. भावे ( ठाणें )

# अफझलखानाचा वध.

# शाहिस्तेखानाची मोहीम.

किंमत तीन आणे.

व्यापाऱ्यांस भरपूर सवलत

अवश्य संग्रहणीय ]                    [ विद्वनांचे उत्तम अभिप्राय

हे दोन निबंध म्हणजे श्री शिवछत्रपतींच्या अचाट धाडसाची, अपूर्व प्रसंगावधानाची, अद्भूत पराक्रमाची व अलौकिक बुद्धिसामर्थ्याची साक्ष पटविणारे पुरावेच होत.